

संस्कृत साहित्य समिति

विक्रमोर्वशीय

संस्कृत
साहित्य
सरिता
: ३

कालिदास-कृत

विक्रमोर्वशीय

कथासार
अमरेन्द्र



वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

प रि च य

कविकुलगुरु कालिदासाच्या तीन प्रसिद्ध नाटकांपैकीं 'विक्रमोर्वशीय' हें एक आहे. चंद्रवंशांतील पराक्रमी राजा पुरुरवा आणि स्वर्गलोकांतील श्रेष्ठ अप्सरा ऊर्वशी यांच्या प्रेमाची ही कथा तशी फार प्राचीन—वेदकालांतील आहे. परंतु कालिदासानें या कथेवर आपल्या प्रतिभेनें भाषेचा साजशृंगार चढवून ती प्रेक्षकांपुढें ठेवली. काव्याचे सर्व गुण त्यांत उत्तम रीतीनें उतरलेले असल्यामुळें वाचकांनाहि 'विक्रमोर्वशीया'पासून भरपूर आनंद मिळूं शकतो.

देवलोकांत राहणारे इन्द्रादि देव आणि मृत्युलोकावर वावरणारे पुरुरव्यासारखे महापराक्रमी मानवश्रेष्ठ यांचे परस्परसंबंध किती जिव्हाळ्याचे होते; मृत्युलोकावरील मानवांबद्दल स्वर्गांतील सर्वसामान्य समजूत काय होती; इत्यादि गोष्टींची कल्पना या कथानकावरून येऊं शकते. तसेंच तपस्वी जनांबद्दल राजेलोकहि किती आदर बाळगीत तें लक्षांत येतें.

कालिदासानें या नाटकांत दाखविलेल्या मनुष्यस्वभावाच्या सूक्ष्म छटा मन रमविणाऱ्या आहेत, तसाच पुरुरवा, ऊर्वशीच्या विरहानें विलाप करीत असतांनाचीं वर्णनें कल्पनाविलासाच्या दृष्टीनें खरोखरी अप्रतिम आहेत. या नाटकाचें मराठी भाषांतर झालेलें आहे. मराठी व हिंदी कथासारहि उपलब्ध आहे. त्यांच्या आधारानेंच हें कथासार सर्वसामान्य वाचकांसाठीं तयार करण्यांत आलें आहे.

—लेखक

विक्रमोर्वशीय

" धांवा, धांवा, देवांचा कोणी मित्र असेल त्यानें आमचें रक्षण करावें, " अशा किंकाळयांनीं तो पर्वताचा प्रदेश गजबजून गेला होता. चन्द्रवंशांतील पराक्रमी राजा पुरुरवा आपल्या रथांत बसून ह्याच वेळीं तिकडून चालला होता. त्याच्या कानीं या किंकाळया पडतांच तो थबकला. सारथ्याला त्यानें रथ त्या किंकाळयांच्या दिशेला वळविण्यास सांगितलें.

थोडयाच वेळांत राजाला असें दिसून आलें कीं, गंधर्व-लोकांतील अप्सरांचाच हा आक्रोश होता. त्यांची मैत्रीण उर्वशी हिला तिच्या एका दुसऱ्या सखीसह कोणीतरी पळवून नेलें होतें. राजा पुरुरव्याची ओळख पटतांच त्यांनीं त्याला सारा वृत्तांत सांगितला. कुबेराच्या राजधानीहून परत येत असतांना वाटेंत केशी राक्षसानें उर्वशीला चित्रलेखेसह पळवून नेलें आहे, तेव्हां आपण तिला सोडवून आणा अशी त्यांनीं पुरुरव्याला विनंती केली.

राजा पुरुरवा हा चंद्रवंशांतील बुधाचा मुलगा. प्रतिष्ठान ही त्याची राजधानी. पुरुरवा मोठा देखणा व तसाच महापराक्रमीहि पण होता. त्याने काशीराजाची कन्या

औशीनरी हिच्याशीं लग्न केलें. ही औशीनरीसुद्धां अत्यंत सुंदर होती व राजाचें तिच्यावर फार प्रेम होतें.

पुरुरव्याच्या पराक्रमाची ओळख ज्या अप्सरांना होती त्यांना खात्रीच वाटली कीं हा आपल्या मैत्रिणीला सोडवून आणणार. त्यांनीं तसें इतर अप्सरांना बोलूनहि दाखविलें. पुरुरव्यानें देव व राक्षस यांच्या युद्धांत यापूर्वी अनेक वेळां देवांना मदत केलेली होती. देवांच्यासाठीं इन्द्राच्या बाजूनें लढून अनेक राक्षसांचा पराभव केलेला होता. या त्याच्या पराक्रमामुळें व त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल इन्द्र महाराज पुरुरव्यावर प्रसन्न होते. हेंहि त्यांपैकीं अनेक अप्सरांना माहीत होतें. त्यामुळें त्यांनीं आपल्या इतर मैत्रिणींना सांगितलें कीं, तुम्ही मुळींच घाबरूं नका. आपल्या मैत्रिणींना राजा इतक्यांत सोडवून इथे आणील.

त्याप्रमाणें घडलेंहि. केशी आकाशमार्गानें त्या दोन्ही सुंदर अप्सरांना घेऊन चालला होता, इतक्यांत पुरुरव्यानें येऊन त्याला गांठलें. केशी हाहि मोठा बलवान दैत्य होता. त्यानें पुरुरवा आपल्या पाठीवर येत आहे असें पाहून त्या अप्सरांना आपल्या खांद्यावरून खालीं उतरून ठेवलें व तो पुरुरवा राजाशीं लढायला तयार झाला. राजाहि सावधच होता. त्यानें प्रथम बाणांच्या वर्षावानें त्याला हैराण केला व नंतर रथाखालीं उतरून आपल्या वज्रानें त्यानें त्या दैत्याला ठार मारलें.

राजा पुरुरव्याचा हा विलक्षण पराक्रम पाहून उर्वशी अगदीं चकित होऊन गेली. कारण केशी दैत्य म्हणजे एक मोठें प्रकरणच होतें. पुरुरव्याच्या पराक्रमाबद्दल उर्वशीच्या मनांत आदर उत्पन्न झाला आणि तसेंच त्याचें रूप पाहून त्याच्याविषयीं प्रेमहि वाटूं लागलें. उलट उर्वशीच्या सौंदर्यानें राजाहि तिच्यावर मोहून गेला.

रंभा, मेनका इत्यादि इतर अप्सरा हेमकूटावर पुरुरव्याची वाट पाहात बसल्या होत्या. थोड्याच वेळांत पुरुरव्यानें केशीच्या तडाख्यांतून सोडविलेल्या त्यांच्या दोघी मैत्रिणी उर्वशी व चित्रलेखा यांना त्यांच्यापाशीं आणून पोहोंचविलें. अर्थातच सर्व अप्सरांनीं त्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा प्रकट करून म्हटलें, " महाराज, शेंकडों कल्पांपर्यंत आपण पृथ्वीचें पालन करीत राहा. " त्यांचें हें बोलणें होत आहे इतक्यांत आकाशांतून आणखी एक रथ वेगानें खालीं आला. त्यांतून चित्ररथ गंधर्व खालीं उतरला. उर्वशीला केशीनें पळवून नेल्याची वार्ता नारदाकडून इन्द्राला कळतांच त्यानें उर्वशीला सोडवून आणण्यासाठीं गंधर्वराज चित्ररथाला ताबडतोब सैन्यासह पाठविलें होतें. परंतु चित्ररथाला वाटेंतच पुरुरव्याच्या पराक्रमाची हकीकत चारणांच्या तोंडून कळली.

चित्ररथ व पुरुरवा यांचा जुना स्नेह होता. त्यामुळें त्यानें पुरुरव्याला आग्रहपूर्वक म्हटलें कीं, तुम्हीच उर्वशीला

बरोबर घेऊन आतां इन्द्र महाराजांकडे चला. इन्द्र महाराजांची आपण ही फारच मोठी कामगिरी केलेली आहे. त्यांच्यावर तुमचे हें मोठे उपकार आहेत. परंतु पुरुरव्याला राजधानींत कांहीं महत्त्वाचीं कामें असल्यामुळें त्यानें चित्ररथाच्या आग्रहाला विनयानें नकार दिला.

एकमेकांचा निरोप घेतांना उर्वशी लाजेनें इतकी चूर झाली होती कीं राजाचा निरोप घेण्यासाठीं तिच्या तोंडांतून शब्दहि फुटेना. तेव्हां चित्रलेखेनेंच तिच्या वतीनें राजाकडे मोठ्या गौरवपूर्वक निरोप मागितला. त्यावर राजा इतकेंच म्हणाला, "या; परंतु पुन्हा दर्शन घडावें अशी इच्छा आहे."

उर्वशीला बोलवत नव्हतें तरी तिच्या मनांत राजा पुरुरव्याबद्दलचेंच विचार चालले होते. चित्ररथाचा रथ तिला घेऊन निघाला तेव्हां अगदीं अखेरपर्यंत ती राजाकडे सारखी वळून वळून बघत होती. राजाहि ती दिसेनाशी होईपर्यंत तिच्याकडे पाहात होता. नंतर तो मोठ्या जड अंतःकरणानेंच आपल्या राजधानीकडे परतला. शरिरानें तो राजधानींत आला खरा पण त्याचें मन मात्र उर्वशी-बरोबर गेलें होतें.

राजाचें मन कशांतच रमेना. त्याला सारखा उर्वशी-चाच ध्यास लागला. त्याचें लक्ष राज्यकारभाराच्या गोष्टीं-

कडे लागेना. तसेंच विलासांतहि त्याला गोडी वाटेना. आपला विदूषक मित्र माणवक याच्या खेरीज राजाला आपल्या मनांतील दुःख दुसऱ्या कोणापाशीं बोलून दाखविणें शक्यहि नव्हतें. कारण तें होतेंच तसें नाजुक. तरीपण महाराणीच्या स्त्रीदृष्टींतून ती गोष्ट सुटली नाहीं. महाराजांच्या उदासपणाचें खरें कारण शोधून काढण्याची तिला उत्कंठा लागली व तें काम तिनें आपली दासी निपुणिका हिच्यावर सोंपविलें. निपुणिका नांवाप्रमाणें खरीच निपुण होती. तिनें ही माहिती काढण्यासाठीं लगेच अचूक मनुष्य गांठला. राजा कोणतीहि खाजगी गोष्ट विदूषक माणवकापाशीं बोलणार आणि त्याच्या तोंडांत तर तीळहि भिजत नाहीं. निपुणिकेनें माणवकाला जरा हरभऱ्याच्या झाडावर चढवतांच त्यानें चटसारें सांगून टाकलें. आणि तो वर असेंहि म्हणाला कीं, काय करावें बुवा! महाराजांना या मोहांतून सोडविण्यासाठीं प्रयत्न करतां करतां मी अगदीं थकून गेलों आहें.

निपुणिकेचें काम झालें. तिनें ताबडतोब जाऊन राणीच्या कानावर ही सगळी हकीकत घातली.

पण राजा मात्र बेचैन होऊन गेलेला होता. उर्वशी आपल्याला पुन्हा कधीं भेटेल याचाच विचार त्याच्या मनांत चाललेला होता. त्या दिवशीं राजानें राज्यकार

भाराचीं कामें कशींबशीं आटोपलीं व तो प्रमदवनांत विश्रांतीसाठीं येऊन बसला. बरोबर विदूषक होताच. वसंत ऋतु बहरला होता. लता-वृक्ष वसंताच्या नव्या देणग्यांनीं नटले होते. परंतु राजाला मात्र त्या कशांतच गोडी वाटत नव्हती. विदूषकाशीं त्याचें बोलणें चाललें होतें तें उर्वशी कशी प्राप्त होईल याविषयींच.

इकडे उर्वशीच्या मनाचीहि स्थिति तशीच झाली होती. देवलोकांतील नृत्य-गायनांतहि तिचें मन लागत नव्हतें. राजा पुरुरव्याविषयींची तिची हुरहूर इतकी वाढली कीं शेवटीं तिनें गुप्तपणानें मृत्युलोकावर येऊन आपल्या प्रियकराची गांठ घेण्याचा निश्चय केला.

प्रमदवनांत राजा विदूषकासह बोलत बसला होता त्याच वेळीं उर्वशी तेथें येऊन उतरली. तिच्याबरोबर तिची आवडती मैत्रीण चित्रलेखाहि होती. परंतु त्या आपल्या दैवी शक्तीमुळें अदृश्य होत्या. त्यांना राजा व विदूषक दिसत होते व त्या दोघांचें चाललेलें बोलणेंहि त्यांना चांगलें ऐकूं येत होतें. राजाला मात्र उर्वशी या ठिकाणीं यावेळीं आलेली असेल अशी शंकाहि येण्याचें कारण नव्हतें. त्यामुळें तो आपल्या मनांतील उर्वशीविषयींची ओढ मोकळेपणानें बोलून दाखवीत होता.

“ मित्रा माणवका, प्रिय उर्वशीची भेट होईल असा कांहीं उपाय तरी सांग. तिच्याशिवाय मला जगणें अशक्य आहे. ”

राजाच्या त्या प्रश्नावर विदूषकानें उत्तर दिलें कीं, यासाठीं एक तर तूं झोंपी जा, म्हणजे स्वप्नांत तुला तिचें दर्शन घडेल; नाहींतर तिचें चित्र काढून तें पाहात बैस.

" नाहीं रे, मित्रा, विरहदु:खामुळें झोंप अशक्य आहे आणि दु:खाश्रूंनीं डोळे सारखे भरून आल्यामुळें चित्र काढणें दुरापास्त आहे ! "

राजाचें हें प्रत्युत्तर ऐकून मात्र उर्वशीला राहवेना. तिची खात्री पटली कीं राजा खरोखरीच आपल्या प्रेमानें वेडा झाला आहे. तेव्हां तिनें भोजपत्रावर एक श्लोक लिहून तें पत्र जणूं आकाशांतूनच पडलें असें चित्रलेखेकरवीं राजाच्या पुढ्यांत टाकविलें. कुतूहलानें राजानें तें पुढ्यांत येऊन पडलेलें पत्र वाचून पाहिलें. त्याला अतिशय आनंद झाला. प्रत्यक्ष उर्वशीच भेटल्यासारखें त्याला वाटलें. त्यानें भरल्या अंत:करणानें तें भोजपत्र विदूषकाजवळ देऊन त्याला तें नीट सांभाळून ठेवण्यास बजावलें.

आतां उर्वशीनें राजाचा अधिक अन्त पाहिला नाहीं. चित्रलेखेसह ती राजापुढें प्रकट झाली. राजाचा तिनें जयजयकार केला. राजा पुरुरवा तर या पुनर्भेटीच्या आनंदानें नुसता फुलून निघाला. सुखांत डुंबूं लागला. पण हें सुख त्याला फार वेळ मिळालें नाहीं. उर्वशी प्रकट होऊन पुढें येते आणि राजाला तिच्याशीं बोलण्यासाठीं

जरा एकान्त मिळतो न मिळतो इतक्यांत आकाशांतून शब्द ऐंकू आले, " उर्वशीनें ताबडतोब देवेंद्राकडे निघून यावें. भरतमुनींनीं बसविलेल्या नाटकाचा प्रयोग इन्द्रसभेंत व्हावयाचा आहे, तरी विलंब लावूं नयें. "

देवदूताच्या तोंडून ऐकूं आलेली ही इंद्राची आज्ञा मोडणें उर्वशीला शक्यच नव्हतें. पुन्हा तिच्या तोंडांतून दु:खानें शब्द उमटेनासा झाला. तेव्हां चित्रलेखेनेंच लगबगीनें पुढें होऊन तिच्या वतीनें पुरुरव्याचा निरोप घेतला. उर्वशी झाली तरी पराधीनच होती. तेथें अधिक थांबणें म्हणजे देवाचा अपराध करण्यासारखेंच होतें. तेव्हां राजानेंहि अति कष्टी होऊन तिला निरोप दिला. मात्र ती निघतां निघतां तो जड शब्दांत म्हणाला, " मला विसरूं नकोस. "

उर्वशी चित्रलेखेसह आकाशमार्गानें देवलोकांत निघून गेली. आतां पुन्हा तिची भेट केव्हां होईल कोण जाणे; म्हणून राजानें तिचें प्रेमपत्र घेऊन तेंच पुन: पुन्हा वाचीत बसावें असा विचार केला. त्यानें विदूषकापुढें हात करून म्हटलें, " तें मघाचें भोजपत्र दे बघूं इकडे. "

पण विदूषकाची स्वारी गडबडलेली दिसली. त्या वेंधळ्याच्या हातून तें कोठेंतरी तेवढ्यांत हरवलें होतें. गडबडींत तें कोठें पडलें त्याच्या कांहीं लक्षांत येईना. पत्र

नाहींसें झालेलें पाहून राजाला फार राग आला. आणि मग तो विदूषकाबरोबर स्वत:हि तें पत्र हुडकूं लागला.

एवढ्यांत रागानें लाल लाल झालेली राणीची स्वारी तिथें येऊन थडकली. आपल्यासारखी सुंदर पत्नी असतांना राजाचें मन एका अप्सरेवर बसावें याचा तिला फार संताप आला होता. "पुरुष हे असेच चंचल" असें म्हणून ती त्याला खूप बोलली. एवढ्यांत आगींत तेल पडावें तसें दासी निपुणकेनें तें थोड्या वेळापूर्वी हरवलेलें उर्वशीचें प्रेमपत्र राणीच्या हातीं आणून दिलें. मग काय विचारतां! प्रत्यक्ष प्रमाणच झालें. तिनें तें राजाच्या अंगावर फेंकीत मोठ्या तोऱ्यानें म्हटलें, "हेंच हुडकीत होतात ना दोघेजण! हें घ्या आपलें प्रेमपत्र. ही मी चाललें. उगीच आपल्या प्रेमप्रसंगांत अडचण कशाला!" आणि तडक तिथून परत फिरली. राजानें अनेक प्रकारें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तिची विनवणी केली. तिचे पायसुद्धां धरले. पण राणी अधिक एक शब्दहि न बोलतां रागारागानें निघून गेली. 'बाईची जात आहे. थोडा वेळ गेला म्हणजे हा क्रोधाग्नि आपोआप शान्त होईल.' असें राजानें स्वत:चें समाधान करून घेतलें व तोहि आपल्या नित्यकर्मासाठीं तेथून निघून गेला.

भरतमुनींनीं नवीनच बसविलेल्या नाटकाचें नांव होतें

'लक्ष्मीस्वयंवर'. त्याची पद्यरचना स्वतः सरस्वतीनें केलेली होती. गंधर्व आणि अप्सरा यांच्याकडून भरतमुनींनीं हें नाटक उत्तम प्रकारें बसवून घेतलेलें होतें. आणि आतां त्याचा पहिला प्रयोग देवसभेंत व्हावयाचा होता.

प्रयोगांत उत्तम रंग भरला होता. नाटक उत्तम वठलें होतें. इतक्यांत रसाचा विरस व्हावा तसें झालें. चूक उर्वशीची होती. मेनका वारुणीची भूमिका करीत होती. वारुणी ही लक्ष्मीची सखी. आणि उर्वशीकडे होती मुख्य भूमिका लक्ष्मीची. स्वयंवरासाठीं तिन्ही लोकांतून उत्तमोत्तम पुरुष जमलेले होते. लोकपाल स्वतः भगवान विष्णुहि स्वयंवरमंडपांत उपस्थित होते. त्या प्रसंगाला उद्देशून वारुणी विचारते–"लक्ष्मी, तुला या सर्वजणांत कोण अधिक प्रिय वाटतो ? "

"पुरुरवा–" वास्तविक लक्ष्मीच्या भूमिकेंतील उर्वशीनें उत्तर द्यावयाला हवें होतें "पुरुषोत्तम" म्हणजे विष्णु. परंतु तिच्या ध्यानीं मनीं पुरुरवाच असल्यामुळें आपली नाटकांतली भूमिका विसरून तिच्या तोंडून 'पुरुषोत्तमा'-ऐवजीं 'पुरुरवा' असें निघून गेलें. परंतु तेवढ्या एका शब्दानेंच सारा रसभंग झाला. नाट्याचार्य भरतमुनि संतापानें नुसते भडकून गेले. आपल्या इतक्या उत्तम वठत असलेंल्या नाटकाचें उर्वशीनें मातेरें केलेलें पाहून ते कडाडले,

" उर्वशी, तूं मीं शिकविलेंल्याप्रमाणें काम केलें नाहींस, आणि या स्वर्गलोकांत असतांनाहि तुझें एका यःकश्चित मानवावर मन बसलें ! तेव्हां तुला यापुढें स्वर्गात राहतां येणार नाहीं. तूं मृत्युलोकावर जाऊन पडशील. हींच तुला आतां शिक्षा."

या शापवाणीपुढें कोणाचेंच कांहीं चालण्यासारखें नव्हतें. तरीपण नाटचप्रयोग संपल्यावर इन्द्र उर्वशीजवळ येऊन तिचें सांत्वन करीत म्हणाला, " उर्वशी, दुःख करूं नकोस. पुरुरव्यावर तुझें मन जडलें आहे, तेव्हां तूं आनंदानें मृत्युलोकांत त्याच्यापाशीं जाऊन राहा. तुला होणाऱ्या मुलाचें मुख पुरुरव्यानें पाहीपर्यंत तुला त्याच्याजवळ राहण्यास कांहीं हरकत नाहीं. त्या राजर्षीनें माझ्यावर पुष्कळ उपकार केलेले आहेत, तेव्हां त्याचें उतराई होणेंहि आवश्यकच आहे. चल, मी आपल्या सारथ्याबरोबरच तुला पुरुरव्याकडे पाठवून देतों."

राणी औशीनरी कांहीं झालें तरी आर्य स्त्री होती. पतीचा केवढाहि अपराध असला तरी त्याच्यावर कायमचा राग धरून बसणें तिला शक्यहि नव्हतें व तिच्या तसें मनांतहि नव्हतें. या बाबतींत राजा पुरुरव्याची कल्पना बरोबर ठरली होती. राजाच्या मनांतून आपण उतरलों

आहोंत तेव्हां पुन्हा त्याला आपल्याविषयीं पूर्वींप्रमाणें प्रेम वाटूं लागावें अशी साहजिकच तिची इच्छा होती. म्हणून तिनें राग सोडून राजाच्या अनुरागासाठीं एक व्रत घेतले- त्या व्रताची सांगता राजाराणींनीं चंद्रपूजन करून कराव- याची होती. त्यासाठीं राणीनें उत्सव जिथें चालू होता. त्या मणिहर्म्य–भवनांत राजानें यावें अशी विनंती करणारा निरोप कंचुकीच्या हातीं पाठविला. राजाचें मन उर्वशीवर गेलें होतें हें खरें असलें तरी त्याचा अर्थ राणी त्याला अप्रिय झाली होती असा नव्हता. त्याचें राणीवर पूर्वीं- प्रमाणेंच प्रेम कायम होतें. त्यामुळें राजानें राणीच्या आमंत्रणाचा ताबडतोब स्वीकार केला व तो तिच्या उत्सव- प्रासादांत आला. दोघांचीं एकमेकांशीं प्रेमाचीं बोलणीं झालीं व एकमेकांच्या मनांतील राग नाहींसा होऊन गेला. चंद्रपूजन यथासांग पार पडलें. तेव्हां राजा आपण होऊन म्हणाला, “ मी तुझा त्याग करीन ही भीति अगदीं सोडून दे. मी तुला वचन देतों कीं कांहीं झालें तरी मी तुला दूर करणार नाहीं आणि तूंच माझी पट्टराणी म्हणून राहशील. तसेंच माझ्या तुझ्यावरील प्रेमांतहि कधीं अंतर पडणार नाहीं.” राणीला तें आश्वासन ऐकून फार समाधान वाटलें. आपल्या व्रताचें फळच लाभल्यासारखें तिला झालें. त्या आनंदाच्या भरांत पतीला आनंद व आरोग्य लाभावें म्हणून तिनेंहि सांगून टाकलें, “ चंद्र व रोहिणी यांच्या साक्षीनें मी आज महाराजांना प्रसन्न करून घेत आहें.

आजपासून महाराजांचें मन जिच्यावर बसलें असेल आणि जी स्त्री महाराजांशीं विवाह करूं इच्छित असेल,तिच्याशीं मीहि प्रेमानें वागेन."

राजाला राणीचें हें वाक्य आवडलें असलें तरी तसें त्यानें वरून दाखविलें नाहीं. " म्हणजे तूं मला इतका प्रेम-वेडा झालेला समजतेस कीं काय ? " असें राजानें त्यावर हंसून म्हटलें. परंतु राणीनें गंभीरपणानें एवढेंच उत्तर केलें कीं, " तें तुमचें तुम्ही पाहा. मी जें व्रत करण्याचें ठरविलें होतें तें पुरें झालें आहे खरें." आणि असें म्हणून ती आपल्या अंत:पुराकडे निघून गेली.

पण, राजाराणीचें हें संभाषण सुरू होण्यापूर्वींच उर्वशी वास्तविक तिथें येऊन पोहोंचलेली होती. नेहमींप्रमाणें चित्रलेखाहि तिच्याबरोबर होती. परंतु अदृश्यपणाचें आवरण त्यांनीं घेतलें असल्यामुळें त्या कोणालाहि दिसत मात्र नव्हत्या.

राणीनें राजाला दिलेलें आश्वासन तिनें नुकतेंच प्रत्यक्ष ऐकलें होतें. आणि आतां राणी तेथून निघूनहि गेलेली होती. त्यामुळें आतां प्रकट व्हावयास कांहीं हरकत नाहीं असें समजून उर्वशीनें चित्रलेखेसह पुरुरव्यापुढें प्रकट होण्याचें ठरवलें. इतक्यांत राजा विदूषकाकडे पाहात म्हणाला, " मित्रा माणवका, यावेळीं उर्वशी जर इथें असती तर

किती छान झालें असतें नाहीं." उर्वशीला आणखी काय पाहिजे होतें! तिनें पटकन् जाऊन राजाचे डोळे झांकले. राजानें तिचीं नाजुक बोटें व कोमल स्पर्श ओळखला. दोघांनाहि अत्यानंद झाला. राजानें तिला आपल्या शेजारीं बसवून घेतलें आणि उर्वशीहि पत्नीच्या अधिकारानें त्याच्याजवळ निःसंकोचपणें बसली.

चित्रलेखेनें राजाला सांगितलें कीं, "इन्द्राच्या आज्ञेनेंच माझी ही मैत्रीण मी आपल्या हातीं सुपूर्त करीत आहें. तिचें रक्षण उत्तम प्रकारें करा; नाहींतर भिऊन ती स्वर्गांत परत जाईल." इतकें सांगून चित्रलेखा स्वर्गांत निघून गेली.

पुरुरवा–उर्वशी यांचा गांधर्वपद्धतीनें विवाह झाला. पुरुरव्यानें राज्यकारभार मंत्र्यांच्या हातीं सोंपवून आपण उर्वशीसह गंधमादन पर्वतावर राहावयास गेला. पुष्कळ दिवसपर्यंत उर्वशीच्या गोड सहवासांत त्यानें तेथें आनंदांत व सुखांत काळ घालविला.

पुढें एक दिवस तीं दोघें उपवनांत हिंडत होतीं. थोड्या वेळानें तीं एके ठिकाणीं बसून राहिलीं. समोर मंदाकिनी नदीचें विशाल पात्र होतें. आणि तिच्या कांठाकांठानें वनें उपवनें पसरलेलीं होतीं. उर्वशी वाळूचे किल्ले बांधीत

होती. राजाचें लक्ष तिच्याकडे नव्हतें. तो तेथून समोरच दिसणाऱ्या एका विद्याधरकन्येकडें टक लावून पाहात होता. सहज उर्वशीची दृष्टी वर गेली तों तिला तें दृश्य दिसलें. " माझ्यासारखी सुंदर स्त्री सहवासाला असतांनाहि जर या पुरुषाचें चित्त दुसरीकडे जातें तर याचा काय नेम घ्या! " या विचारानें ती शंकाकुल झाली व तिला रागहि आला. ती तडक उठून चालूं लागली. राजा तिच्या मागें मागें जात तिची समजूत घालूं लागला. परंतु उर्वशी कांहीं केल्या थांबेना. आणि पुढें तर पाहतां पाहतां ती दिसेनाशीच झाली.

मग मात्र पुरुरव्याला फार दुःख झालें. विरहानें त्याला वेड लागण्याची पाळी आली. " उर्वशी गेली तरी कुठे मग ? " राजा विचार करूं लागला; पण त्याला त्याचें कांहीं उत्तर सांपडेना. तेव्हां तिच्या शोधासाठीं तो भ्रमिष्टासारखा वणवण हिंडूं लागला.

त्याला वाटलें कीं, कोणी राक्षस ऊर्वशीला पळवून घेऊन चालला आहें. तेव्हां त्यानें त्या राक्षसाला लढाईचें आव्हान दिलें. पण मग त्याच्या लक्षांत आलें कीं, आपण ज्याला राक्षस समजलों तो खरा राक्षस नसून तो मोठा थोरला काळा ढग आहे. आणि जें आपण राक्षसाचें धनुष्य म्हणून समजलों तें तर खरें इन्द्रधनुष्य आहे. त्या धनुष्या-पासून बाण सुटून आपल्या अंगावर येत आहेत असें आप-

त्याला वाटलें पण ते बाण नसून पावसाचे मोठमोठे थेंब आहेत आणि आकाशांत चमकणारी ती ऊर्वशी नसून वीज आहे.

मग एकदां त्याच्या मनांत आलें कीं, उर्वशी ही अप्सरा देवलोकांत राहणारी असल्यानें तिच्या अंगीं दैवी शक्ति आहे. तेव्हां त्या शक्तीनें ती कोठें अदृश्य होऊन तर राहिली नसेल. पण एवढ्यावर त्याचें समाधान कसें होणार ?

" मोरा ! माझी प्रिया पाहिलीस का रे तूं कुठें ? " राजा पुरुरवा उर्वशीच्या विरहानें इतका वेडा बनला होता कीं, हा अमानवी प्राणी आपल्याला उत्तर देऊं शकणार नाहीं हेंहि त्याच्या लक्षांत आलें नाहीं.

मोरापासून दूर होऊन मग तो मधुरकंठी कोकिळेसमोर येऊन उभा राहिला. तिलाहि त्यानें तोच प्रश्न केला. " एकतर मला उर्वशीचा ठिकाणा सांग नाहींतर मला तरी तिच्यापाशीं घेऊन चल. हे कोकिळे ! रुसलेल्या स्त्रियांचा रुसवा दूर करण्यांत तूं पटाईत आहेस. आणि माझी पत्नी उर्वशी माझ्यावर कां रुसली म्हणून विचारशील तर मला खरोखरीच त्याचें कारण माहीत नाहीं. आणि स्त्रियांना रुसायला कारण थोडेंच लागतें; विनाअपराधहि त्या

आपल्या पतीवर रुसतातच कीं ! " पण पुरुरव्याची ही बडबड ऐकायला कोकिळेला कोठें सवड होती ! म्हणून नाइलाजानें राजा तेथूनहि बाजूला झाला.

त्यानंतर मानस सरोवराकडे चाललेल्या राजहंसांना आणि चक्रवाकांनाहि त्यानें तोच प्रश्न केला. " माझी उर्वशी कुठें आहे सांगा." परंतु त्यांपैकीं कोणीहि त्याच्या या केविलवाणेपणानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं; तसेंच हत्तीलाहि तें देतां आलें नाहीं.

" हे पर्वतेश्वरा ! माझी हरवलेली उर्वशी कुठे पाहिलीस का सांग. " राजानें समोर दिसणाऱ्या एका मनोहर पर्वताला तोच प्रश्न केला. लगेच त्याच्या कानावर कांहीं आवाज पडला. त्याला वाटलें, पर्वतानें प्रत्युत्तरच दिलें. परंतु खरें म्हणजे तो त्याच्या स्वतःच्याच बोलण्याचा पडसाद होता.

तेथून तो उर्वशीसारख्याच दिसणाऱ्या नदीकडे गेला. जवळच चरणाऱ्या हरणासहि त्यानें आपला प्रश्न विचारला. तांबड्या अशोकापाशींहि आपल्या आवडत्या उर्वशीसंबंधीं त्यानें चौकशी केली. पण त्याच्या या प्रश्नाला कोणीच उत्तर दिलें नाहीं.

असाच वेड्यापिश्यासारखा वनभर हिंडत असतां राजाचें लक्ष जमिनीवर पडलेल्या एका चोळीकडे गेलें. ती

चोळी उर्वशीची होती. तें पाहून त्याला तेवढ्यानेंच किती तरी आशा वाटूं लागली. तो आणखी तसाच पुढें निघाला. जातां जातां दगडाच्या कपारींत त्याला कांहींतरी लाल लाल चमकतांना दिसलें. सिहानें मारलेल्या हत्तीचें मांस किंवा आगीची ठिणगी यांपैकीं कांहीं तें असेल ही शंका त्याच्या मनानेंच नाहींशी केली. कारण मांस इतकें चमकत नाहीं आणि एवढा पाऊस पडून गेल्यावर ठिणगी तरी कशी उरणार ? म्हणून त्यानें पुढें होऊन अधिक लक्षपूर्वक पाहिलें, तेव्हां त्याला दिसून आलें कीं, तो एक लाल हिरा आहे. परंतु तो हिरा हातांत उचलून घेतांच त्याच्या लक्षांत आलें कीं 'या हिऱ्याचा आतां आपल्याला काय उपयोग! जिच्या केशकलापांत तो शोभून दिसला असता, ती तर नाहींशी झाली. जिला या हिऱ्यामुळें आनंद झाला असता तिला आपण मुकलों. आतां हा हिरा नेऊन काय करणार!' या विचारानें राजानें तो मौल्यवान हिरा फेंकून दिला.

परंतु इतक्यांत आकाशवाणी झाली. "राजा ! घे घे तो हिरा. प्रियजनांची भेट करवून देणारा हिरा आहे तो. देवी पार्वती जेव्हां येथें राहात असे तेव्हां तिच्या पायाला लावलेल्या लालीपासून तो बनलेला आहे. हा हिरा ज्याच्या-जवळ असेल त्याचें आवडतें माणूस त्याला लवकर भेटतें. या मौल्यवान हिऱ्याची तुला गरज आहे, तो तूं तुझ्या-जवळ ठेव."

हें शब्द कोण उच्चारीत आहे तें राजाला दिसत नव्हतें. मात्र आपल्या हितासाठींच कोणीतरी ऋषि आपल्याला ही सूचना करीत आहेत असें त्याच्या लक्षांत आलें. त्या कृपेबद्दल त्या अदृश्य ऋषीचे आभार मानून त्यानें तो हिरा पुन्हां उचलून घेतला; आणि त्याच क्षणीं त्याची दृष्टि एका सुंदर वेलीकडे गेली. त्या वेलीवर फुलें नव्हतीं. तरीपण का कोण जाणें, त्या वेलीनें त्याचें लक्ष स्वतःकडे आकर्षित करून घेतलें. त्या सुंदर वेलीकडे पाहिल्याबरोबरच एकाएकीं राजाला तिच्याविषयीं उत्सुकता वाटूं लागली. त्याचें मन एकदम खळबळलें. त्याला वाटलें कीं, ही उर्वशीच उभी आहे. त्यानें त्या भावनेच्या भरांत त्या वेलीला जाऊन मिठी मारली. आणि काय आश्चर्य ! ती खरोखरीच उर्वशी होती. उर्वशीचा स्पर्श राजाला जाणवला, पण त्यानें डोळे मिटून घेतलेले होते. डोळे उघडून पाहिलें तों समोर उर्वशीच उभी. तेव्हां त्याचें देहभान नाहींसें होऊन तो खालीं कोसळला. हळूहळू उर्वशीनें त्याला शुद्धीवर आणला, शान्त केला.

त्या वेलींतून उर्वशी कशी प्रगटली हें रहस्यहि त्याला नंतर उलगडलें. राजानें विद्याधरकन्येकडे पाहिल्यामुळें संतापलेली उर्वशी बेभान होऊन निघाली ती चुकून गंधमादन पर्वताजवळ असलेल्या कुमारवनांत शिरली. तेथें स्त्रियांना

यायला मनाई होती. कार्तिकेय तेथें तप करीत बसला होता. व त्यानें आपल्या तपांत विघ्न उत्पन्न होऊं नये म्हणून असा शाप देऊन ठेवला होता कीं, जर कोणी स्त्री या कुमारवनांत प्रवेश करील तर ती वेल बनून जाईल. उर्वशीचेंहि तेंच झालें होतें. पण त्याची राजाला काय माहिती !

आणि आतां तिला पुन्हा मनुष्यदेह प्राप्त झाला तोहि अशाच अद्भुत दैवी घटनेमुळें होता. देवी पार्वतीच्या पायाच्या लालीपासूनच बनलेला तो जो हिरा राजाच्या हातीं आला त्याच्या प्रभावानेंच उर्वशीची त्या शाप-शरीरांतून सुटका झालेली होती.

पुनर्भेटीच्या आनंदाचा पहिला भर ओसरल्यावर उर्वशीनें आपल्या वागण्याबद्दल राजाची क्षमा मागितली. " माझ्या संतापामुळें आपल्याला फार त्रास सहन करावा लागला. " ती म्हणाली. परंतु राजानें तिला अधिक बोलूंच दिलें नाहीं. " तुझ्या भेटीनेंच माझें अंतःकरण प्रसन्न होऊन गेलें आहे, " असें त्यानें उत्तर दिलें, आणि लगेच राजानें ज्या हिऱ्याच्या प्रभावानें उर्वशीची भेट झाली होती तो हिरा तिच्या मस्तकावर धारण करावयास तिला दिला.प्रतिष्ठान राजधानींतून बाहेर पडल्याला आतां पुष्कळ काळ लोटला होता. तेथील प्रजाहि राजा परत

येण्याची वाट पाहात होती. तेंव्हां उर्वशीनें आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें बनविलेल्या विमानांत बसून तीं दोघेंहि थोड्या वेळांत प्रतिष्ठान नगरींत येऊन पोहोंचलीं.

प्रतिष्ठान नगरींत परत येऊन पुरुरवा पुन्हा पूर्ववत् सुखानें राज्य करूं लागला. आतां त्याला उणीव म्हणून कशाची असेल तर ती एकाच गोष्टीची–मुलाची होती. आपल्याला मुलगा असावा याविषयीं राजा साहजिकच फार उत्सुक होता. परंतु उर्वशी मात्र त्या बाबतींत उदासीन होती.

दिवसामागून दिवस चालले होते. राजा पुरुरवा उर्वशीच्या सहवासांत सुखी होता. अशा एका दिवशीं सकाळीं लवकर उठून ती स्नानाला गेली असतां तिच्या मस्तकावरील अलंकारांत असणारा तो लाल हिरा दासीनें पेटींत ठेवला. परंतु त्याचा तो लाल लाल रंग पाहून आसपास घिरट्या घालीत असलेल्या एका प्रचंड पक्ष्याला वाटलें कीं, तो मांसाचाच तुकडा आहे. त्यामुळें त्या पक्ष्यानें खालीं झेंप घेतली व तो हिरा चोंचींत धरून तो आकाशांत उडून गेला. राजाला ही गोष्ट समजतांच त्यानें आपलें धनुष्यबाण आणण्यास सेवकांना आज्ञा केली. परंतु त्यावेळपर्यंत तो पक्षी त्या हिऱ्यासह दृष्टीआडहि झाला होता. तेव्हां राजानें आज्ञा सोडली कीं, तो पक्षी त्या हिऱ्याचें पुढें काय

करतो तें त्याच्यावर पाळत ठेवून मला कळवा. हिरा त्याच्या घरट्यांत सांपडला किंवा खालीं पडलेला मिळाला तरी घेऊन या.

त्या लाल हिऱ्याबद्दल राजाला एवढें महत्त्व वाटणें साहजिकच होतें. कारण त्या हिऱ्यामुळेंच त्याला ऊर्वशी पुन्हा भेटली होती. त्याविषयींच तो आपला मित्र विदूषक याच्याशीं बोलत होता. इतक्यांत एक सेवक तेथें आला व राजाचा जयजयकार करून म्हणाला, " आपल्या रागानेंच बाणाचें रूप घेऊन त्या पक्ष्याला ठार मारलें आणि या हिऱ्यासह त्याला खालीं पाडलें. हा तो हिरा व हा तो बाण ! " सेवकानें दोन्ही वस्तू राजापुढें ठेवल्या.

हिरा स्वच्छ करून सुरक्षित जागीं ठेवण्याची सूचना देऊन राजानें तो बाण पाहण्यासाठीं हातांत घेतला. त्या बाणावर कोणाचें तरी नांव कोरलेलें आहे ही गोष्ट त्या सेवकानें राजाच्या ध्यानांत आणून दिली. तेव्हां अधिकच कुतूहलानें तो बाण राजानें पाहिला. त्यावर लिहिलें होतें— " पुरुरवा व उर्वशी यांचा मुलगा आयु याचा हा बाण आहे. " राजानें मोठ्यानें वाचलेलें तें नांव ऐकून शेजारीं बसलेल्या विदूषकाला फार आनंद झाला. त्यानें पुत्रजन्माबद्दल राजाचें अभिनंदनहि केलें. परंतु राजा मात्र बुचकळ्यांत पडला. 'हा माझा पुत्र केव्हां झाला ?

उर्वशीनें ही गोष्ट माझ्यापासून लपवून कां ठेवली ?' त्याच्या लक्षांत येईना ही काय भानगड आहे ती.

राजा त्या आश्चर्यांत गुंग असतांनाच दुसऱ्या एका सेवकानें येऊन म्हटलें कीं, "च्यवन ऋषींच्या आश्रमांतून एका मुलाला बरोबर घेऊन कोणी एक तपस्विनी आपल्या भेटीसाठीं आलेली आहे." राजानें त्या दोघांनाहि आंत घेऊन येण्यास सांगितलें. तीं दोघें आंत येतांच त्या तेजस्वी मुलाकडे राजाची नजर गेली. त्या मुलाला पाहिल्याबरोबर राजाचें हृदय वात्सल्यानें अगदीं भरून आलें. तथापि आपल्या मनांतील ही खळबळ बाहेर न दाखवितां राजानें त्या तापसीला नमस्कार केला. त्याच्या नमस्काराचा स्वीकार करून तापसीनें राजाला आशीर्वाद दिला आणि लगेच त्या बरोबर आणलेल्या मुलाकडे वळून म्हटलें, "बाळ, आपल्या वडिलांना प्रणाम कर."

त्याप्रमाणें त्या मुलानें राजाला नमस्कार करतांच राजानें त्याला मन:पूर्वक आशीर्वाद दिला आणि त्या तापसीला मोठ्या उत्कंठेनें विचारलें, "हा मुलगा कोण ? आपल्याकडे कसा आला ?"

तेव्हां ती तापसी सांगूं लागली : " महाराज, हा उर्वशीचा मुलगा. याचें नांव आयु. जेव्हां हा मुलगा

जन्माला आला तेव्हांच उर्वशी कांहीं विचार करून याला माझ्यापाशीं ठेवून गेली होती. च्यवन ऋषींपाशीं त्याचें सर्व शिक्षण व्हावें अशी तिची इच्छा होती. त्याप्रमाणें च्यवन ऋषींनीं क्षत्रियाच्या मुलाला आवश्यक असे सर्व संस्कार त्याच्यावर केलेले आहेत. आश्रमी विद्यांचें अध्ययन झाल्यानंतर त्याला च्यवन ऋषींनीं धनुर्विद्या पण शिकविली. याचा ओढा क्षात्रकर्माकडे विशेष दिसतो. आज तर समिधा तोडण्यासाठीं इतर आश्रमकुमारांबरोबर बाहेर जात असतांना यानें आश्रमधर्माविरुद्ध वर्तन केलें. त्यानें आपल्या बाणानें आकाशांतून चाललेल्या एका निरपराध पक्ष्याचा जीव घेतला. म्हणून च्यवन ऋषींनीं त्याला आपल्या आईकडे पोहोंचवून येण्यास मला सांगितलें आहे. तेव्हां कृपाकरून उर्वशीची–माझी भेट करवून द्या, एवढीच विनंती आहे."

उर्वशीला बोलावणें गेलें. राजानें आपल्या मुलाला छातीशीं घट्ट धरलें. पुत्रप्राप्तीच्या आनंदानें त्याचें हृदय नाचूं लागलें. उर्वशी आली व प्रथम तें दृश्य पाहून ती बुचकळ्यांत पडली. परंतु तापसीची ओळख पटतांच तिच्या ध्यानांत सर्व प्रकार आला. उर्वशी पुढें येतांच आयूनेंहि तिच्या गळां मिठी घातली. तिचे डोळे भरून आले.

"महाराज, आपण मला क्षमा करा. हें रहस्य मीं

आजवर मुद्दामच आपल्यापासून लपवून ठेवलें होतें;" असें म्हणून उर्वशीनें मागील हकीकत सर्व त्याला सांगितली. "आपण यज्ञसमारंभासाठीं नैमिषारण्यांत गेलां होतां तेव्हांची ही गोष्ट आहे. तेव्हां हा पुत्र जन्माला आला. परंतु मी ती गोष्ट आपल्या कानापर्यंत येऊं दिली नाहीं. त्याचें कारण असें आहे, पूर्वीं एकदां इन्द्र सभेंत आपल्यावर प्रेम करण्याच्या अपराधाबद्दल भरतमुनींनीं मला शाप दिला होता कीं, मी स्वर्गांत न राहतां मृत्युलोकावर येऊन पडेन. त्यावर इन्द्र महाराजांनीं मध्यस्थी करून असें सुचविलें कीं, राजाला पुत्रमुख दिसेपर्यंत तूं मृत्युलोकावर राहशील. मीं जर पुत्रजन्माची वार्ता आपल्या कानावर घातली असती तर मुलाला पाहण्याचा हट्ट आपण धरला असतात व मी आपल्या सहवासाला अन्तरलें असतें. तसें होऊं नये या स्वार्थानेंच मी अशी वागल्यें. परंतु महाराज, आतां मला येथें थांबतां येणार नाहीं. इन्द्र महाराजांची आज्ञा मोडतां येणार नाहीं. आपण पुत्रमुख पाहिलेंत, आतां मला स्वर्गांत निघून गेलें पाहिजे." असें म्हणून उर्वशी दुःखानें रडूं लागली.

सर्वांनाच वाईट वाटलें. राजा तर मूर्च्छित होऊन पडला. शुद्धीवर आल्यावर त्यानें आपला विचार प्रकट केला कीं, मुलाच्या नांवानें राज्यभार सोंपवून आपण तपश्चर्येसाठीं वनांत निघून जाणार. परंतु इतक्यांत नारदाची स्वारी तेथें

येऊन पोहोंचली. नारदाची पूजा करून राजानें त्याला योग्य आसनावर बसविलें. “ राजा, मी इन्द्राकडून निरोप घेऊन आलों आहें. त्याला दैवी शक्तीनें कोणाच्या मनांत काय चाललेलें आहे तें समजतें. तूं मुलावर राज्यकारभार सोंपवून वनांत जाण्याच्या विचारांत आहेस हें त्याला समजल्यावरूनच त्यानें मला तुझ्याकडे पाठविलें आहें. इन्द्राचा तुला असा निरोप आहे कीं, त्रिकालज्ञ मुनींची अशी भविष्यवाणी आहे कीं, देव-दानवांचें फार मोठें युद्ध पुढें होणार आहें. तुझ्यासारख्या पराक्रमी साहाय्यकाची आम्हांला अत्यंत गरज आहे. तेव्हां तूं इतक्यांतच राज्य-त्याग करून वनांत जाऊं नयेस. उर्वशी आयुष्यभर तुझ्या-पाशीं राहील. तशी इन्द्राची तिला आज्ञा आहे. ”

इन्द्राकडून आलेला हा निरोप ऐकून सर्वांनाच आनंद झाला. राजानें तपाला जाण्याचा बेत रहीत केला. आयु युवराजपदाला योग्य झाल्यामुळें इन्द्राकडूनच त्याला युवराज्याभिषेक करण्यासाठीं सामग्री आलेली होती. तेव्हां आयूला युवराज्याभिषेक करण्यांत आला. युवराज आयूनें सर्वांना नमस्कार केला व नंतर तो उर्वशीच्या सांगण्या-प्रमाणें महाराणी औशीनरीला नमस्कार करण्यासाठीं आपल्या आईसह निघाला. राजाहि त्यांच्याबरोबरच आपल्या आवडत्या राणीला भेटण्यासाठीं निघाला. तेव्हां

नारदानें विचारलें, "राजा, इन्द्रानें तुझी आणखी कोणती इच्छा पुरी करावी ?"

राजानें नम्रपणें सांगितलें कीं, "इन्द्राच्या प्रसन्नतेपलीकडे मला काय हवें असणार ! तथापि मी इतकें मागतों कीं, लक्ष्मी व सरस्वती या नेहमीं एकमेकींशीं फटकून राहणाऱ्या दोघींनींहि सज्जनांच्या हितासाठीं एकत्र मिळून राहावें, सर्व संकटें नाहींशीं व्हावींत, सर्वांचे मनोरथ पूर्ण व्हावेत आणि सर्वत्र सुखच सुख असावें."

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

३

1. रघुवंश
2. शाकुन्तल
3. विक्रमोर्वशीय
4. मृच्छकटिक
5. प्रतिमा
6. महावीरचरित
7. उत्तररामचरित
8. मालतीमाधव
9. स्वप्नवासवदत्ता
10. दशकुमारचरित : भाग १
11. दशकुमारचरित : भाग २
12. वेणीसंहार
13. कुमारसम्भव
14. मालविकाग्निमित्र
15. हर्षचरित
16. नागानंद
17. पंचरात्र
18. रत्नावली
19. कादम्बरी
20. मेघदूत
21. शिशुपालवध
22. किरातार्जुनीय
23. बुद्धचरित
24. मुद्राराक्षस
25. प्रतिज्ञायौगंधरायण
26. अविमारक
27. अभिषेक
28. मध्यमव्यायोग
29. कर्णभार
30. उरुभङ्ग
31. पार्वतीपरिणय
32. नलोदय

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

